MHAH190016812022

<u>रे मु नं ४३७/२०२२ मध्ये नि. ५ वर आदेश</u>
( लक्ष्मी अरुण अंधारे वि. भाउसाहेब लक्ष्मण काळे व इतर )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ अनुसार प्रतिवादी विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

वादीची केस थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. दावा मिळकत गट क्र. ३६९/२/ब/२/१/४ ही मौजे दहिगाव ने, ता. शेवगाव येथील आहे. दावा मिळकत वादीच्या मालकी वहिवाटीची असून वादीची त्यावर शांततामय कब्जेवहिवाट आहे. वादी प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहेत. प्रतिवादी क्र २ यांनी सन २०१६ मध्ये तहसीलदार शेवगाव यांच्याकडील आदेश क्र क्र./वाटप/एस.आर/१५५/२०१६ दि. १०/०६/२०१६ अन्वये वादीच्या नावे केली आहे. त्याचा फेरफार क्र ६५८३ हा असून त्याप्रमाणे सदर दावा मिळकतीच्या सात बारा सदरी मालकी हक्कामध्ये वादी हिच्या नावाची नोंद कायदेशीर झालेली असून तेंव्हा पासून सदर दावा मिळकतीवर वादी हिची शांततामधये कब्जेवाहिट असून सदर दावा मिळकत ही वादी हिच्या ताबे कब्जेवहिवाटीत आहे. सदर दावा मिळकत वादी हिने अकृषिक वापर वाणिज्य करुन घेतलेली असून त्याबाबत सदर दावा मिळकतीच्या सात बारा सदरी फेरफार क्र ६९८५ अन्वये अकृषिक वापर वाणिज्य नोंद झालेली आहे. दावा मिळकत वादी हिच्या मालकी हक्क ताबे वहिवाटीत आहे. प्रतिवादी क्र १ यांची मिळकत वादी हिच्या मिळकतीच्या उत्तर बाजूस असून प्रतिवादी क्र १ हा नेहमी वादी हिच्या दावा मिळकतीस येणकेण कारणाने हरकत अडथळा करत असतो. दरम्यान वादी हिस अशी माहिती मिळाली की प्रतिवादी क्र १ याने त्याच्या घराचे बांधकाम चालू केलेले आहे. त्यासाठी त्याने खड्डे खोदलले असून प्रतिवादी क्र १ हा वादी हिच्या दावा मिळकतीच्या क्षेत्रामध्ये उत्तर बाजूने १५ फूट आत बांधकामासाठी खड्डे खेदलेले आहे अशी माहिती मिळाली.

३. दि. ११/१०/२०२२ रोजी वादी तिच्या पतीसह दावा मिळकतीत गेली असता तिला प्रतिवादी क्र १ याने दावा मिळकतीमध्ये उत्तर बाजूने १५ फूट आत बांधकामाचे खड्डे खोदलेले दिसले. तेंव्हा वादी व तिच्या पतीने प्रतिवादी क्र १ यास वादी हिच्या दावा मिळकतीत उत्तर बाजूने

१५ फूट आत बांधकामाचे खोदलेले खड्डे बुजून टाकावेत तसेच प्रतिवादीने त्याच्या मिळकतीमध्ये बांधकामासाठी खड्डे घ्यावे अशी विनंती केली. तेंव्हा प्रतिवादी क्र १ याने वादी हि महिला आहे व वादीचे पती एकटे आहेत असे पाहून वादी व वादीच्या पतीला म्हणाला की याठिकाणी घराचे बांधकामासाठी खड्डे घेतले आहेत तुम्हाला काय करायचे ते करा. प्रतिवादी क्र २ ते ४ यांनी दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूला १० बाय १० अशा दोन टप-या टाकल्या आहेत असे दिसले. तेंव्हा प्रतिवादी क्र २ ते ४ यांना देखील वादी व वादीच्या पतीने विनंती केली की सदर टप-या काढून घ्या त्यावेळी सदर प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी शिवीगाळ, दमदाटी करुन वादीच्या पतीला लाथाबुक्याने माहराण केली व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्याबाबत वादीच्या पतीने शेवगाव पोलीस स्टेशनला प्रतिवादी विरुध्द तक्रारी अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र १ ते ४ वादीची दावा मिळकत ही फुकटात मिळावी या उद्देशाने वादीच्या दावा मिळकतीवर दहशतीच्या जोरावर अतिक्रमण करीत आहे. वादीने सदरच्या अर्जात विनंती केली आहे की दावा मिळकतीत प्रतिवादी क्र १ याने उत्तर बाजूने १५ फूट आत बांधकामाचे खड्डे खोदलेले आहेत. सदर बांधकामाचे खोदलेले खड्डे बुजून टाकावेत, प्रतिवादी क्र २ ते ४ यांनी पश्चिम बाजूने वादीच्या दावा मिळकतीवर टाकलेल्या १० बाय १० पत्र्याच्या दोन टप-या तात्काळ काढून घ्याव्यात व प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी दावा मिळकतीवर अतिक्रमण करु नये तसेच हरकत अडथळे निर्माण होतील असे कृत्य करु नये असे तूर्तातूर्त मनाई हुकूम मागितलेले आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीच्या नि.क्र. ५ चे अर्जावर नि. क्र २० वर त्याचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी असे कथन केले आहे की दावा मिळकत वादीच्या मालकी वहिवाटीची मिळकत असून वादीची शांततामय कब्जेवहिवाट आहे हे वादीने दाव्यात केलेले कथन प्रतिवादी क्र १ ते ४ यांना कबूल नाही. प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी वादीने केलेली वादकथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी पुढे असे कथन केले आहे की प्रतिवादी क्र १,२ व त्यांची बहिण बबनबाई रुपचंद काळे यांनी दि. २१/७/१९९९ रोजी मौजे दहिगाव ने गट क्र ३६९/२/ब/२ ही मिळकत क्षेत्र ००.३ आर खरेदी घेतलेली आहे व तशी नोंद होउन प्रतिवादी क्र १, २ व त्यांची बहिण बबनबाई यांच्या नावाची नोंद सात बारा उता-यावर झालेली आहे. प्रतिवादी क्र १, २ व त्यांची बहिण बबनबाई रुपचंद काळे या तिघांमध्ये अद्याप पर्यंत सरसर निरस मानाने वाटप झालेले नाही, हद्दी खुणा व दिशा निश्चीत झालेले नाही. प्रतिवादी क्र १,२ व त्यांची बहिण यांचा आजपर्यंत मिळकतीवर ताबा आहे. प्रतिवादी क्र २ यांना प्रतिवादी क्र ३ व ४ ही मूले व सुजाता लालमन काळे ही मुलगी अशी एकूण तीन अपत्ये आहेत. वादी यांचा प्रतिवादींशी कोणतेही नातेसंबंध नाहीत. असे असताना वादी यांनी कामगार तलाठी यांना हाताशी धरुन वादी ही प्रतिवादी क्र २ ची मुलगी आहे असे खोटे दाखवून व प्रतिवादींच्या खोटया सहया

करुन वादी यांच्या हक्कात कलम ८५ नुसार खोटे व बेकायदेशीर वाटपपत्र करुन घेतलेले आहे. कलम ८५ नुसार सह हिस्सेदाराशिवाय इतर कोणासही वाटपपत्र सामिल करता येत नाही. वाटपपत्रात वादी ही प्रतिवादी क्र २ ची मुलगी असल्याचे नमूद केले आहे. परंतु यात कोणतेही तथ्य नाही. वाटपपत्रातल संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा आहे. वाटप करताना प्रतिवादी यांना कोणतीही नोटिस व कल्पना दिली नाही.

५. मौजे दहिगाव ने येथील गट क्र ३६९/२/ब/२ पैकी क्षेत्र ३ आर हे प्रतिवादी क्र १, २ व त्यांची बहिण यांचे सामाईक क्षेत्र होते व आहे. सदर मिळकतीचे अद्यापपर्यंत सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. क्षेत्राचे वाटपपत्र प्रतिवादी यांना कोणत्याही प्रकारची कल्पना व नोटिस न देता तसेच प्रतिवादी क्र १, २ व त्यांची बहिण यांनी वाटपपत्राच्याकामी संमती दिलेली नसतानाही व कधीही हक्कसोडपत्र करुन दिलेले नसतानाही खोटे व बेकायेदशीर वाटप एसआर क्र १५५/२०१६ करुन घेतलेले आहे व त्यानुसार फेरफार क्र ६५८१ अनवये दि. २६/८/२०१६ रोजी फेरफार क्र ६५८१ ची चूकीची व बेकायदेशीर नोंद केलेली आहे. सदर मिळकतीला तुकडे जोड - तुकडेबंदी कायदा लागू असतानाही तहसीलदार साहेब शेवगाव यांनी १आर क्षेत्राबाबत बेकायदेशीर वापटपाचा आदेश केला आहे. वादी ही प्रतिवादी क्र २ ची मुलगी नसतानाही तिने खोटे व बनावट कागदपत्रांच्या अधारे वाटपपत्र तयार केले असल्याने वादीची खरी मुलगी सुजाता लालमन काळे हिने वाटपपत्रानुसार झालेला फरफार क्र ६५८१ रद्द करण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी साहेब पाथर्डी यांच्याकडे आरटीएस क्र १६ सन २०२२ दाखल केलेला आहे. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. म्हणून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

६. वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमूद केलेल्या कारणांसाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| १ | वादी मागतो तशी तूर्तातूर्त मनाई मिळण्यास सकृतदर्शनी स्थिती असल्याचे तो सिध्द करतो का ? | ..होय |
| २ | वादी मागतो तशी तूर्तातूर्त मनाई मिळण्यास समतोलत्व त्यांच्या बाजूने असल्याचे तो शाबित करतो का ? | ..होय |
| ३ | वादी मागतो तशी तूर्तातूर्त मनाई नाकारल्यास त्यांचे पैशाने भरुन न येणारे नुकसान होईल असे वादी शाबित करतो का ? | ..होय |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

७. वादीने त्याच्या म्हणण्यापुष्टयर्थ नि.३ सोबत खालील कागदपत्रे दाखल केली

१. मौजे दहिगावने येथील गट नं ३६९/२/ब/२/१/४ चा डीजीटल सात बारा उतारा,

२. फेरफार क्र. ६९८५ चा उतारा (डीजीटल)

३. शेवगाव पोलीस स्टेशनला दिलेला अर्ज (एन सी) झेरॉक्स प्रत

४. प्रतिवादी क्र १ ते ४ हे वादीच्या दावा मिळकतीमध्ये करत असलेले अतिक्रमणाबाबतचे व बांधकामाबाबतचे छायांकित फोटो

५. वादीच्या आधारकार्डची व्हेरिफाईड झेरॉक्स प्रत

वादीने तिच्या म्हणण्यापुष्टयर्थ नि क्र १३ सोबत खालील कागदपत्र दाखल केले

१. दिसत्या परिस्थीतीवरील बांधकामाचे पीलर उभारत असल्याचे फोटोग्राफ

२. दिसत्या परिस्थीतीवरील बांधकामाचे साहित्याचे फोटोग्राफ

वादीने तिच्या म्हणण्यापुष्टयर्थ नि.क्र.२४ सोबत खालील कागदपत्र दाखल केले.

१. मा. उपविभागीय अधिकारी पाथर्डी यांच्यासमोर उशीर माफीचा अर्ज क्र १६/२०२२ ची नि.क्र. १ ची सर्टिफाईड प्रत

२. मा. उपविभागीय अधिकारी पाथर्डी यांचा उशीर माफीच्या अर्जावर वादीने दिलेल्या म्हणण्याची सर्टिफाईड प्रत

३. मा. उपविभागीय अधिकारी पाथर्डी यांनी उशीर माफीचा अर्ज क्र १६/२०२२ वर दिलेल्या न्यायनिर्णयाची सटर्टिफाइड प्रत

४. तहसील कार्यालय शेवगाव यांच्याकडे झालेल्या वाटपपत्राची सर्टिफाईड नक्कल

८. प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी त्याच्या म्हणण्यापुष्टयर्थ नि.२३ सोबत

१. मौजे दहिगाव ने येथील फेरफार क्र ६५८३ ची प्रत

२. प्रतिवादी क्र २ चे राशन कार्ड व्हेरिफाईड प्रत

३. प्रतिवादी क्र २ चे मूलीचे शाळा सोडण्याच्या दाखल्याचे व्हेरिफाईड प्रत

४. प्रतिवादी क्र २ ची मुलगी हिने मा उपविभागीयअधिकारी पाथर्डी साो यांच्या न्ययालयात दाखल केलेले आरटीएस अपील

प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी त्यांच्या म्हणण्यापुष्टयर्थ नि.क्र २६ सोबत

१. प्रतिवादी क्र १ २ व त्यांची बहिण बबनबाई यांनी मौजेदहिगाव ने येथील गट क्र ३६९/२/ब/२ चे घेतलेले खरेदीखतची झेरॉक्स प्रत

<u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u> -

९. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकले. वादीतर्फे विधीज्ञ श्री के एम अंधारे यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी क्र १ ते ४ यांच्या विरुध्द निरंतर ताकिद मनाई हुकूमासाठी या न्यायालयात दाखल केलेला आहे. दावा मिळकत क्र ३६९/२/ब/२/१/४ प्रतिवादी क्र २ ने सन २०१६ मध्ये वादीच्या नावे केलेली आहे. त्याअन्वये फेरफार क्र ६५८३ सदर दावा मिळकतीच्या सात बारा उता-यामध्ये वादीच्या मालकी हक्कामध्ये नोंद झालेला आहे. वादीने सदरची दावा मिळकत वाणिज्य वापरासाठी वापरण्यात यावी म्हणून दावा मिळकत अकृषिक वापर वाणिज्य करुन घेतलेली असून त्याबाबत सदर दावा मिळकतीच्या सात बारा सदरी फेरफार क्र ६९८५ ची नोंद झालेली आहे. सन २०१६ पासून वादी दावा मिळकतीची मालक व कब्जेवाहिवाटीत आहे. प्रतिवादी क्र १ ने उत्तरेकडून वादीच्या दावा मिळकतीत १५ फूट खडयाचे खोदकाम करुन अतिक्रमण केलेले आहे. वादी व वादीच्या पतीने प्रतिवादी क्र १ यांना खड्डा बुजवून टाकण्याची विनंती केली असता प्रतिवादी क्र १ याने त्यांना दमदाटी केली. सदर घटनेची तक्रार वादीने पोलीस स्टेशनला केली असता प्रतिवादी विरुध्द एनसी दाखल केली आहे. तहसीलदार साो यांच्याकडे कलम ८५ नुसार वाटपपत्र झाले. सदर वाटपपत्राला प्रतिवादी क्र १ ते ४ किंवा प्रतिवादी क्र २ ची बहिण बबनबाई यांनी मागील साडेपाच वर्षात हरकत घेतलेली नाही. प्रतिवादी क्र २ ची मुलगी सुजाता हिने उशीर माफीचा चौकशी अर्ज उपविभागीय अधिकारी साो पाथर्डी यांच्याकडे दाखल केला होता परंतु तो अर्ज फेटाळण्यात आला आहे. वादीतर्फे विधीज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की वादीने वाटपपत्र, महसूल दप्तरी सात बारा उता-यावर झालेल्या फेरफार नोंदी आणि दावा मिळकतीच्या दिसत्या परिस्थीतीचे छायाचित्र दाखल करुन तेथे बांधाकम चालू असल्याचे प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली आहे. न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. कारण सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीला जागा शिल्लक राहणार नाही. प्रतिवादी क्र १ ते ४ हे संगनमताने वादीला दावा मिळकतीपासून बेदखल करण्यासाठी बांधकाम करीत आहेत आणि अतिक्रमण करीत आहेत. सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीला कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणून सदरचा अर्ज हा मंजूर करण्याची विनंती केली आहे.

१०. उलटपक्षी प्रतिवादीचे विधीज्ञ श्री शेख वाय एस यांनी असा युक्तीवाद केला की दावा मिळकत खरेदीखताने सामाईक क्षेत्र आहे. त्याचे आजपर्यंत वाटप झाले नाही. वादी आणि प्रतिवादी क्र २ चे काहीएक नाते नाही. प्रतिवादी क्र २ ची मुलगी वादी नाही. अद्यापपावेतो सामाईक क्षेत्राचे हद्दी खुणा व दिशा ठरलेल्या नाहीत. प्रांताने उशीर माफीचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्याचे अपील अप्पर विभागीय अधिकारी यांच्याकडे चालू आहे. सामाईक क्षेत्र असताना वाटपपत्राने ते देता येत नाही. वादी आणि प्रतिवादीने १आर क्षेत्राचे वाटप केले आहे. वादीचा त्या जमीनीवर ताबा

नाही. वादी मुलगी असल्याचा पुरावा आणू शकलेली नाही. वाटप खोटे आहे. खोटी मुलगी दाखवून वादीने बेकायदेशीर वाटप तयार केलेले असून वादी न्यायालयाची दिशाभूल करीत आहे म्हणून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

११. वरील मुददयांची पुनरावृत्ती टाळण्याकरता ते एकत्रीत चर्चिले जात आहेत.

१२. कायद्याची स्थापीत स्थिती अशी आहे की तात्पुरत्या मनाई हुकूमाकरता प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असून मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे, या तीनही बाबी वादी यांनी सिध्द करणे गरजेचे आहे.

१३. वादी यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता वादीने अभिलेखावर वाटपपत्राची साक्षांकित प्रत दाखल केलेली आहे. तसेच तहसीलदार, तहसील कार्यालय शेवगाव यांचा गट क्र ३६९/२ब/२ क्षेत्र १आर वादी यांच्या नावावर केल्याचे आदेश दाखल केलेले आहेत. वादीने दावा मिळकतीचे सात बारा उतारा फेर क्र. ६९८५ दाखल केलेले आहे. वादीने दि. १२/१०/२०२२ रोजीची प्रतिवादीविरुध्द दाखल केलेली एनसी तक्रार अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच दावा मिळकतीचे दिसत्या परिस्थीतीचे छायाचित्र त्याठिकाणी बांधकाम होत असल्याचे दाखवण्यासाठी सादर केले आहे. प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी सदरच्या अर्जाला म्हणणे दिलेले असून त्यांनी वाटपपत्र खोटे व बेकायदेशीर असल्याचे कथन कलेले आहे. प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी अभिलेखावर प्रतिवादी क्र १,२ व त्याची बहिण बबनबाई यांनी दहिगाव ने येथील गट क्र ३६९/२ब/२ चे खरेदीखताची प्रत दाखल केली आहे. सदरचे क्षेत्र हे सामाईक क्षेत्र असून त्याचे वाटप करता येणार नाही असा युक्तिवाद प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री शेख यांनी केला आहे. उलटतपक्षी वादीतर्फे विधीज्ञ श्री के एम अंधारे यांनी युक्तीवाद करतेवेळी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की तहसीलदार सो., तहसील कार्यालय शेवगाव यांनी वाटप/एसआर/१५५/२०१६ ची नमूना ए ची नोटिस दि. ३/५/२०१६ रोजी संबंधितांना बजावली होती व बजावणी करतेवेळी हरकती मागवल्या होत्या. परंतु नेमलेल्या तारखेपर्यंत कोणीही हरकत घेतली नाही म्हणून वाटप करण्यात आले. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की आज रोजी दावा मिळकतीचे बाजारभाव वाढले म्हणून पैश्यांच्या हव्यासापोटी प्रतिवादी क्र २ ने त्याची मुलगी सुजाता हिला हाताशी धरुन तब्बल साडे पाच वर्षानंतर उपविभागीय अधिकारी पाथर्डी यांच्यासमोर उशीर माफीचा अर्ज क्र १६/२०२२ दाखल केला. परंतु सदरचा उशीर माफीचा अर्ज फेटाळण्यात आलेला आहे.

१४. वादीचे विधीज्ञ श्री के एम अंधरे यांनी असा युक्तीवाद केला की वादीने वेळावेळी दिसत्या परिस्थीतीचे छायाचित्र अभिलेखावर सादर केलेले आहेत. दाव्याचे कामकाज होण्यास विलंब होउ शकतो. परंतु दरम्यानच्या काळात बांधकाम पूर्ण झाल्यास वादी हिला दावा मिळकतीपासून वंचित रहावे लागेल आणि तिचे अपरिमीत असे नुकसान होईल. वादीतर्फे विघीज्ञांनी या न्यायालयाने सदरचा अर्जाला प्रतिवादी म्हणणे आणि कैफियत देईपावेतो स्थगिती हुकूम करण्याची विनंती केली होती. त्यादरम्यान प्रतिवादीने बांधकाम थांबवणार नाही असे विधान केल्याचे त्यांच्या युक्तीवादादरम्यान न्यायालयाच्या निदर्शनास आणले. वादीच्या विीज्ञांनी असा युक्तीवाद केला की सदरचा अर्ज मंजूर होण्यासाठी वादीने प्रथमदर्शनी दावा सिध्द केलेला आहे.

१५. दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की वादीने दावा मिळकतीचा सात बारा उतारा दाखल केलेला आहे. त्या सात बारा उता-यावर फेर क्र. ६९८५ वादीच्या नावावर नोंद आहे. तसेच फेरफार क्र ६९८५ ची नोंदवही फेरफारपत्रक वादीने अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यानंतर वादीने वाटपपत्र दाखल केलेले आहे. तहसील कार्यालयाचा आदेश दाखल केला आहे. तसेच दवा मिळकतीचे सद्य स्थितीचे छायाचित्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र २ ची मुलगी सुजाता हिने उपविभागीय साो पाथर्डी यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलाची प्रत सुध्दा वादीने दाखल केली आहे. तसेच सदरचा उशीर माफीचा चौकशी अर्ज उपविभागीय अधिकारी साो पाथर्डी यांनी दि. १५/९/२०२२ रोजी फेटाळल्याचा आदेश देखील दाखल केला आहे. याठिकाणी वादीच्या विघीज्ञांनी केलेल्या युक्तीवादादरम्यान प्रतिवादीने वाटपाला साडे पाच वर्षानंतर हरकत घेण्याचे काय कारण असा प्रश्न उपस्थीत केला. त्यानंतर वादीतर्फ विधीज्ञांनी दि. १५/०९/२०२२ रोजीच्या उपविभागीय साो पाथर्डी यांच्या आदेशातील शेवटचा निष्कर्षाचा परिच्छेद या न्यायालयाच्या निदर्शणास आणला व युक्तीवाद केला की "तहसीलदार शेवगाव यांनी म.ज.म.अ.१९६६ चे कलम ८५ अन्वये वाटपपत्राची नोटिस नमूना अ मध्ये दि. २/५/२०१६ अन्वये प्रतिवादी क्र १ ते ५ यांना देण्यात आलेली होती त्या अन्वये तहसीलदार शेवगाव वाटपपत्र आदेश पारित केले. त्यामुळे वादी (सुजाता लालमन काळे) यांना याबाबत कोणतीही माहिती नाही ही वस्तुस्थीती या प्रकरणात आढळून येत नाही. या निष्कर्षावरुन वादी (सुजाता लालमन काळे) यांचा विलंब माफीचा अर्ज नामंजूर करण्यात आला".

१६. वादीने प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादी क्र १ ते ४ दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन १५ फूट खड्डे खोदून बांधकम करीत असल्याचे कथन केले आहे. त्याबाबत वादीने एन सी तक्रार आणि दावा मिळकतीचे छायाचित्र दाखल केले आहे. प्रस्तुतच्या अर्जात वादीने प्रतिवादीला खड्डे बुजवून टाकण्याचे तसेच दोन टप-या काढून टाकण्याचे आणि दावा मिळकतीत अतिक्रमण

करु नये आणि वादीला हरकत अडथळा करु नये असा स्वरुपाचा मनाई हुकूम करण्याची विनंती केली आहे. दाव्यात वादीने अशा स्वरुपाची दाद मागितलेली आहे. अंतरिम टप्यावर दाव्यातील मुख्य दाद खड्डे बुजवून टाकणे आणि टप-या काढून टाकणे ही दाद देता येणार नाही. ही बाब गुणदोषावर अंतिम निकालाच्यावेळी पाहण्यात येईल.

१७. उपरोक्त सर्व परिस्थीती विचारात घेतली असता आणि वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीस दावा मिळकतीसाठी प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येते व त्यामिळकतीबाबत न्यायाचा समतोलही वादीचे बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादी हयाने वर नमूद दावा मिळकतीमध्ये वादीला हरकत अडथळा झाला तर तिचे कधीही न भरुन येणार नुकसान होईल व तसे वादीने सकृतदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र १ ते ३ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी देउन मुद्दा क्र ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा तूर्तातूर्त मनाईचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. या दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी यांनी वादीचे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये तसेच वादी हिच्या दावा मिळकतीस हरकत अडथळे निर्माण होईल असे कोणतेही कृत्य प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी स्वतः अगर त्याचे नातेवाईक, नोकर चाकर किंवा प्रतिवादी मार्फत ति-हाईत इसमाने करु नये अशी तूर्तातूर्त मनाई देण्यात येते.

३. खर्चाची बाब अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळेस विचारात घेण्यात येईल.

SANJANA UDAY JAGUSTE
Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE
Date: 2022.11.16 16:59:36 +0530

दि. १५/११/२०२२

(एस. यू. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
शेवगाव